# TRACHOMA

# परिचय(introduction)

खुपऱ्या 0.5 टक्के पेक्षा अधिक प्रमाणात आणणारा हा आजार भारतात अजूनही काही ग्रामीण भागात त्रास देत आहे. हा आजार पूर्णत: टाळता येनारा आहे. डोळे आल्यानंतर त्यावर योग्य उपचार केले नाहीत तर गुंतागुंत वाढून खुपऱ्या होतात



- गेल्या काही दशकात परिसर व वैयक्तिक स्वच्छते विषयी जागृती, भरपूर पाणीपुरवठा, सुधारलेला राहणीचा दर्जा यामुळे खुपऱ्याचा संसर्ग लक्षणीय प्रमाणात कमी झाला आहे. मुलींमद्धे हा संसर्ग अधिक प्रमाणात होतो.

# व्याख्या (Definition) :

डोळ्याचा तीव्र दाहक रोग आणि अंधत्वाचे प्रमुख कारण. क्लोमाडिया ट्रॅकोमेटिस या बॅक्टेरियाच्या संसर्गामुळे खुपऱ्या होतो.



**कारक जंतू :**

क्लोमाडिया ट्रॅकोमेटिस जिवाणू

**संसर्गस्त्रोत :**

रूग्णांच्या डोळ्यातील स्त्राव व स्त्रावांनी दूषित झालेल्या वस्तु म्हणजे रुमाल, हात यांचाशी संपर्क आल्याने. काजळ, सुरमा घालताना दूषित हात किंवा वस्तु वापरल्याने.

**अधिशयन काळ :**

5 ते 12 दिवस

**संसर्गजन्य काळ :**

डोळ्यात दूषित जखमा असेपर्यंत. जखम बारी झाल्यानंतर संसर्ग परत पसरत नाही.

# चिन्हे/लक्षणे

- सुरूवातीला डोळे लाल होणे

- एका किंवा दोन्ही डोळ्यातून पाणी येणे

- एक-दोन महिने दुर्लक्ष केल्यास ;
  - वरील पापणीत आतील बाजूस लहान लहान फोड येऊन त्यात कप्पे (follicles) तयार होतात
  - त्यांचा रंग गुलाबीसर करडा असतो
  - बब्बुळाची वरील कडा ही त्याच रंगाची दिसते, तेथे अनेक लहान नवीन रक्त वाहिन्या तयार होतात त्यालाच “पनस” असे म्हणतात

- हळूहळू पॅनस बुब्बुळावर पसरते.

- काही वर्षानी पापणीखालील फोड नाहीसे होतात,पण
- ती पापणी जाड होते.
- ती पूर्ण उघडता येत नाही आणि मिटताही येत नाही.
- त्या पापणीचे केस आतील बाजूस वळतात
- त्यांचे बुब्बुळावर सतत घर्षण होत राहते, बुब्बुळाला जखम होते

- त्यातून सेकंडरी इंफेक्शन होते. ती जखम बरी होते. तेव्हा बुब्बुळाची पारदर्शक्ता नाहीशी होते व रूग्णाला अंशत: किंवा पूर्ण अंधत्व येते, याला “डोळ्यात फूल पडणे” म्हणतात.

# खात्रीलायक रोगनिदान

चिन्हे व लक्षने पाहून रोगनिदान करतात

# प्रतिबंधक उपाय

- सर्वेक्षन-रुग्णशोध
- सर्व कुटुंबाला एकाच वेळी उपचार करणे
- ज्यांना गरज असेल त्यांना पापण्यावर शल्यक्रिया करून त्याचा आकार दुरुस्त करणे
- या आजाराविषयी सर्वांना आरोग्य शिक्षन देणे, ही महत्वाची कलमे आहेत

- **ओषधपचार :**

डोळ्यांसाठी खास बनवलेले 1 टक्के तीव्रतेने tetracycline, erythromycin, rifampicin यापैकी कोणतेही एक प्रतिजैविके मलम घालण्यास देतात. सलाईनच्या पाण्याने डोळे स्वच्छ करावे लागतात.

- **आरोग्य शिक्षण :**

मिठाच्या द्रावणाने दिवसातून दोनदा डोळे कसे धुवावेत आणि मलम कसे लावावे. संसर्ग पसरू नये म्हणून कशी काळजी घ्यावी. याविषयी आरोग्य शिक्षण देणे हे परिचारीकेचे महत्वाचे कर्तव्य आहे

- **विपरीत परिणाम :**

1) डोळ्यात फूल पडते त्यामुळे चेहरा विद्रूप दिसतो
2) अंशत: किंवा पूर्ण अंधत्व येते

❖ **संदर्भ सेवा :**

डोळे आल्याची (conjunctivitis) चिन्हे व लक्षने दिसल्यावर त्याचा उपचार करावा परंतु उपचारला प्रतिसाद देत नसलेले दिसल्यावर वैद्यकीय अधिकाऱ्यकडे पाठवावे


CLEAN FACES, STRONG EYES!
THE SAFE STRATEGY
TO ELIMINATE TRACHOMA
S
SURGERY
to correct Trichiasis
(in-turned lashes)
A
ANTIBIOTICS
to reduce
infection
F
FACIAL
CLEANLINESS
to stop
transmission
E
ENVIRONMENTAL
IMPROVEMENT
to give
safe bathrooms


Thank You
shutterstock.com • 780491263